**<u>अर्ज निशाणी ११५ वरील आदेश</u>**
**<u>(दिनांक १६ सप्टेंबर, २०२५ रोजी पारीत)</u>**

वादींनी प्रस्तूतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादींनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र.९ हे दि.२०/०८/२०२४ रोजी मयत झाले. त्यानंतर प्रतिवादी क्र.९ चे वारस अभिलेखावर घेण्यात आले. परंतु, सदर वारसांपैकी प्रतिवादी क्र.९ड चे नाव आदित्य शिवराज काळे असे आहे. परंतु नजरचुकीने प्रतिवादी क्र.९ ड चे नाव अवधुत शिवराज काळे असे दाव्यामध्ये नमुद झाले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.९ ड चे नाव दुरुस्त होणे आवश्यक आहे.

**०३.** प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास खुलासा दाखल करुन वादींवर खर्चाचा आदेश होवुन अर्ज मंजुर होण्यास हरकत नसल्याबाबत नमुद केले आहे.

**०४.** अर्ज व खुलाशाचे अवलोकन केले. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादींनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र.९ हे दि.२०/०८/२०२४ रोजी मयत झाले. त्यानंतर प्रतिवादी क्र.९ चे वारस अभिलेखावर घेण्यात आले. परंतु, सदर वारसांपैकी प्रतिवादी क्र.९ड चे नाव आदित्य शिवराज काळे असे आहे. परंतु नजरचुकीने प्रतिवादी क्र.९ ड चे नाव अवधुत शिवराज काळे असे दाव्यामध्ये नमुद झाले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.९ ड चे नाव दुरुस्त होणे आवश्यक आहे. प्रस्तुत दुरुस्ती ही औपचारीक स्वरुपाची असल्याने मंजुर केल्यास त्याचा प्रतिवादींवर कोणताही विपरीत परीणाम होणार नाही. तसेच सदर दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्याचा दाव्यावर कोणताही परिणाम होणार नाही किंवा दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. त्यामुळे सदर अर्जात नमुद मागणी केलेली दुरुस्ती उभय पक्षांमधील वाद तथ्यांचे निराकरण होण्यासाठी मंजुर करणे न्यायोचीत होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रस्तूतचा अर्ज **(निशाणी क्र. ११५)** मंजूर करण्यात येतो.

२. वादींना अर्जात मागणी केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. त्याप्रमाणे वादींनी दाव्यात दुरुस्ती करुन पुढील तारखेपावेतो किंवा त्यापुर्वी दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४. वादींनी प्रतिवादींना रक्कम रुपये ४००/– कॉस्ट दयावी.

SANTOSH LAXMAN VAIDYA
Digitally signed by SANTOSH LAXMAN VAIDYA
Date: 2025.09.16 13:51:09 +0530

**घोडेगाव** (संतोष एल. वैद्य)
**दिनांक १६/०९/२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घोडेगाव**